पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक:नस/६/कावि/१३६/२०१८
दिनांक :११/०४/२०१८

प्रति,

मा. ……………………………
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१८ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**कार्यपत्रिका क्रमांक – १६**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१८ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

---------

अ) मा.महापालिका सभा क्र- ११ दि. २०/१२/२०१७, दि.२०/१/२०१८ (दु.१.०० वा.) व दि.५/२/२०१८ (दु.१.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) मा.महापालिका सभा क्र- १२ दि. २०/०१/२०१८ (दु.२.०० वा.) व दि.५/०२/२०१८ (दु.२.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

**नियुक्त्या**

**विषय क्रमांक १)** मा. जाधव राहूल गुलाब व मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे यांनी मा.स्थायी समिती सदस्य पदांचा राजीनामा दिला असल्याने स्थायी समिती सदस्यत्वाच्या दोन जागा रिकाम्या झाल्या असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ अन्वये सदर नैमित्तीक रिकाम्या जागेवर उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून उर्वरित मुदतीपर्यंत पालिका सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे.

**विषय क्रमांक २)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या नेमणे –

१) विधी समिती –

(टिप – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत)

२) महिला व बालकल्याण समिती –

अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

३) शहर सुधारणा समिती -

(टिप–शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

४) क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती -

(टिप – क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत. )

(टिप – उपरोक्त क्र.१ ते ४ प्रमाणेच्या विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.)

------

**प्रश्नोत्तरे**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

**मा.विधी समितीचे ठराव**

**विषय क्रमांक ३)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१/कावि/३३६/२०१८, दि.३१/०३/२०१८
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र. ९६ दि.९/४/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ‘मनोविकृती चिकित्सक’ अभिनामाचे पद र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. या संवर्गामध्ये रिक्त असणारे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र. ८०२/२०१७ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.

‘मनोविकृती चिकित्सक’ पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद

केलेल्या माहितीच्या आधारे दि. ०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरिता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि. १८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'मनोविकृती चिकित्सक' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरिता दि. ०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिति आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तूतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेउन निवड यादीवरील डॉ. वडगावकर गौरव प्रविण यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'मनोविकृती चिकित्सक' या पदावर मा. विधी/ महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे.

तरी डॉ.वडगावकर गौरव प्रविण यांना वेतनश्रेणी र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'मनोविकृती चिकित्सक' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ४)** संदर्भ – १) मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.९७ दि.९/४/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग – अ मधील सहाय्यक आयुक्त या पदाची एकूण ११ पदे मंजूर आहेत. शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील ६ व महानगरपालिकेच्या आस्थापनेतील पदोन्नतीने ५ अशी मंजूर आहेत. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ पदांपैकी सध्या ३ पदे रिक्त असल्याने प्रशासकीय कामकाज पुर्ण कार्यक्षमतेने होत नाही. महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एस.आर.व्ही.-२०१४/ प्र.क्र.३५४/१४/का.१२, दिनांक ०५/१०/२०१५ नुसार काही पदांसाठी पदोन्नती कालावधी ९० टक्के म्हणजेच ४.५ वर्ष पूर्ण झाल्यास पदोन्नती देणेबाबत शासन निर्णय आहे. श्री.संदीप दादासाहेब खोत यांचा प्रशासन अधिकारी या पदावर ४.५ वर्षे कालावधी पूर्ण होत आहे. तसेच सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार ते वर्ग – अ मधील सहाय्यक आयुक्त पदाचे पदोन्नतीस पात्र आहेत. त्यामुळे श्री.संदीप दादासाहेब खोत यांना सहाय्यक आयुक्त या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ५)** संदर्भ – १) मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र. ९८ दि.९/४/२०१८

सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. सदर अंदाजपत्रकामधील सर्व कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस दरवर्षीप्रमाणे एकत्रित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातील कामे वेळेत पूर्ण करणेसाठी या आर्थिक वर्षातील कमी कालावधी विचारात घेता सर्व कामांच्या नावासमोर नमुद अंदाजपत्रकीय रक्कमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता घेतल्यास त्या / त्याकामाची केलेली तरतूद त्याच वर्षात खर्च करता येईल. सबब सर्व कामांच्या नावासमोर नमुद अंदाजपत्रकीय रक्कमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता मिळाल्यास त्या / त्या कामाची केलेली तरतूद त्याच वर्षात खर्च करता येईल व कामांच्या निविदा प्रक्रीया हाती घेऊन सदरची कामे उपलब्ध कालावधीमध्ये चालू करता येतील. सबब सन २०१८-१९ च्या मंजूर अंदाजपत्रकात नमुद केलेप्रमाणे ज्यांचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहेत अशा सर्व भांडवली व महसुली कामे तसेच महसुली अंदाजपत्रकातील वस्तु व सेवांच्या खरेदीच्या लेखाशिर्षा समोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याचा तसेच ही प्रशासकीय मान्यतेची रक्कम निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यावर मंजूर निविदा रक्कमे इतकी राहील यास मान्यता देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी महसुली व भांडवली अंदाजपत्रकाचे सर्व नविन कामांना त्यांच्यासमोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमांना तसेच महसुली अंदाजपत्रकातील वस्तु व सेवांच्या खरेदीच्या लेखाशिर्षासमोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

------

## <u>मा.शहर सुधारणा समितीचे ठराव</u>

**विषय क्रमाक ६)** संदर्भ – १) मा.विकास डोळस, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. ६१ दि.१०/४/२०१८

मौजे बोपखेल येथील स.नं.१४८ पै. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/१५४ खेळाचे मैदान हे आरक्षण असून सदर बाधीत आरक्षणामध्ये लोकांची घरे तसेच त्यांचे वहिवाटीचे रस्ते आहेत. सदरचे आरक्षण विकसित झालेस अनेक लोक भूमीहिन तसेच बेघर होतील. सद्यस्थितीत बोपखेलमध्ये स.नं.१ मध्ये आ.क्र.२/१६७ खेळाचे मैदान हे आरक्षण विकसित करण्याची कार्यवाही चालू असल्याने आ.क्र.२/१५४ खेळाचे मैदान या आरक्षणाची गरज भासत नाही. तरी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७

अन्वये आ.क्र.२/१५४ खेळाच्या मैदानाने बाधीत क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**<u>मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/कामे</u>**

**विषय क्रमांक ७)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/१००/२०१८ दि.३/४/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०३/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १३३१४ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १२६७७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १०४७१ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ६७५४ | एकुण बांधकाम पुर्ण-९७४२<br><br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २९८८ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३ सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ७४९८ लाभार्थी | GOI+GOM=४४९.८८<br><br>लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १४९.९६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५९९.८४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला<br><br>दुसरा हप्ता | ६५४३ लाभार्थी | GOI+GOM=३९२.५८<br><br>लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१३०.८६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५२३.४४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे .

**विषय क्रमांक ८)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.पअक/१/कावि/१११/२०१८ दिनांक ०६/०४/२०१८

मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील निविदा नोटीस क्रमांक ENV/5/2017-18 अन्वये पिंपरी चिंचवड शहराच्या घनकच-याच्या विघटनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वेस्ट टू एनर्जी प्रकल्प DBOT तत्वावर उभारणेकामी प्राप्त निविदांपैकी मे.अन्टोनी लारा एन्व्हायरो प्रा.लि. व मे.ए.जी.एन्व्हायरो यांचे भागीदारी कंपनीने दाखल केलेल्या लघूत्तम दराच्या प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २३२४ दिनांक २८/०२/२०१८ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या निविदेमधील अटी व शर्तीनुसार कामाची व्याप्ती (Scope of Work) खालीलप्रमाणे आहे.

१. सदरचा प्रकल्प बांधकामाचा कालावधी १८ महिने असून या प्रकल्पाचे चालन, देखभाल व दुरुस्ती निविदा अटीशर्तीनूसार एकूण २१ वर्ष कालावधीसाठी आहे.

२. सदरच्या प्रकल्पासाठी मनपाचा आर्थिक हिस्सा म्हणून आवश्यकता असल्यास र.रु. ५०.०० कोटी प्रकल्प पूर्ण होईतोपर्यंत विविध टप्प्यावर देय आहे.

३. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातून निर्माण होणारी वीज त्यांनी विद्यूत मंडळास विकावी किंवा मनपास देण्याची तयारी असल्यास त्यासाठी ५/- रुपये प्रति युनीट दराने मनपास उपलब्ध होईल.

४. ठेकेदाराने मनपा क्षेत्रातून गोळा होणा-या कच-यासाठी १००० टन प्रतिदिन क्षमतेची Material Recovery Facility (MRF) नव्याने बसवून त्याची देखभाल दुरुस्ती करावयाची आहे.

५. मोशी येथील अस्तित्वातील सॅनिटरी लॅन्डफिल साईटची देखभाल व दुरुस्ती करुन आवश्यकतेनूसार त्याचे क्लोजर व नवीन एस.एल.एफ.तयार करणे बंधनकारक आहे.

६. शहरातून गोळा होणा-या कच-याचे वाढते प्रमाण लक्षात घेता २१ वर्षे कालावधीमध्ये आवश्यकतेनूसार प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची आहे.

७. सदरच्या प्रकल्पासाठी सर्व आवश्यक त्या परवानग्या घेणेची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची आहे.

८. याव्यतिरिक्त निविदा अटी शर्ती व करारनाम्यामध्ये नमूद सर्व बाबींची पूर्तता करणे सबंधित ठेकेदारावर बंधनकारक आहे.

९. मनपा मार्फत सदर प्रकल्पासाठी मोशी कचरा डेपो येथील आवश्यक जागा २१ वर्षे कालावधीसाठीLicense to use the land तत्वावर जागेचा वापर करुन देण्यात येणार असून दैनंदिन गोळा होणारा कचरा प्रक्रियेसाठी देण्यात येणार आहे.

१०. लघुत्तम ठेकेदाराने सादर केलेल्या सुधारित दरांच्या प्रस्तावांची मनपाचे तांत्रिक सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्यूशन्स तसेच तांत्रिक सल्लागार समितीने [TAC] छाननी करुन दिलेल्या अहवालातील शिफारशीनूसार विषयांकित प्रकल्पासाठी मनपास प्राप्त मे.अन्टोनी लारा एन्व्हायरो प्रा.लि. व मे.ए.जी.एन्व्हायरो यांचे संयुक्त कंपनीने सादर केलेल्या Financial Modelनूसार द.सा.द.शे ११.५०% व्याजदराने येणारी मूळ टिपींग फी र.रु. ५०४/- आणि प्रत्येक वर्षी कंत्राट कालावधीमध्ये महागाई निर्देशंकानूसार [WPI] होणारी वाढ/घट दरानूसार फरकाची रक्कम अदा / वसूल करणे बंधनकारक राहील. या सुधारित दराने तसेच महानगरपालिकेच्या मदतीने व सहाय्याने गुंतवणूकीवरील व्याजदर द.सा.द.शे ११.५०% पेक्षा कमी दराने प्राप्त झाल्यास मा.स्थायी समितीने मुंजर केलेल्या प्रस्तावातील कपातीच्या प्रमाणात टिपींग फी मध्ये होणारी कपात मान्य करणेत आली आहे.

उपरोक्त प्रमाणे निविदेमधील अटी व शर्तीस अधिन राहून व त्यांनी सादर केलेल्या Financial Model नूसार होणा-या टिपींग फी मधील कपातीस मान्यता देणेचे अधिकार मा.स्थायी समितीने मा.आयुक्त सो यांना प्रदान केले आहेत. या प्रकल्पासाठी संबंधित ठेकेदाराने सादर केलेल्या DBOT (Design – Built – Operate & Transport) तत्वावर उभारणेत येणा-या प्रकल्पाची किंमत सुमारे र.रु. २०८.३६ कोटी इतकी आहे.

सदर विषयांकित प्रकल्पाच्या खालील नमुद बाबीस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

१. सदरच्या प्रकल्पास निविदेमध्ये नमूद मनपाचे अर्थिक अनुदान म्हणून र.रु. ५० कोटी हे निविदेच्या अटी शर्तीनुसार प्रकल्पाच्या विविध टप्प्यावर अदा करणेस व

२. सदरचा प्रकल्प उभारणेसाठी मोशी कचरा डेपो मधील आवश्यक जागा २१ वर्षे कालावधीसाठी निविदेमध्ये नमूद केलेनुसार License to use the Land या तत्वावर वापरणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ अन्वये निविदा व करारनाम्यातील खालील अटी व शर्तीस अधिन राहून उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे

a) सदरची जागा २१ वर्षे कालावधीसाठी निविदेमध्ये नमुद केलेल्या Waste to Energy च्या प्रकल्पासाठीच प्रकरण १० नूसार License to use the Land तत्वावर वापरणेस परवानगी देणेत येईल व यापोटी LicenseFee म्हणून कंपनीस मनपाकडे र.रु. १/- प्रति एकर प्रतिवर्ष प्रमाणे रक्कम भरावी लागेल.

b) Waste to Energy प्रकल्पासाठी निश्चित केलेली मोशी कचरा डेपो येथील जागा ‘जशी आहे तशी’ सबंधित ठेकेदाराला हस्तांतरीत केली जाईल व यानंतर संपूर्ण प्रकल्प कालावधीमध्ये या जागेची सुरक्षिततेची जबाबदारी कंपनीची राहील.

c) सदरच्या जागेची मालकी मनपाची असल्याने प्रकल्प कालावधीत किंवा नंतरही या संपूर्ण जागेवर किंवा त्यापैकी काही जागेवर कंपनीस किंवा त्रयस्थ संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा हक्क (Mortgage Rights) प्रस्थापित करता येणार नाही.

d) प्रकल्प कालावधीत मनपाच्या किंवा शासनाच्या प्रतिनिधींना या जागेमध्ये तपासणी किंवा पाहणी करणेसाठी पूर्ण मुभा राहील. तसेच सबंधित कंपनीला मनपाच्या पूर्वपरवानगीशिवाय सदरची जागा प्रकल्पाव्यतिरिक्त कोणत्याही इतर कारणासाठी वापरता येणार नाही.

e) प्रकल्प कालावधी संपल्यानंतर किंवा दरम्यानच्या काळात करारनामा कोणत्याही कारणाने किंवा प्रकरण १० व ३५ मधील नमूद अटी शर्तींचा भंग केल्यास सदरच्या प्रकल्पासाठीची जागा वापरणेची परवानगी कोणतेही कारण न देता आपोआप रद्द होईल यानंतर प्रकरण ३० मधील तरतुदीनूसार दुस-या कंपनीशी Substitution Agreement केल्यास सर्व प्रकल्प जसा आहे तसा व प्रकल्पाचे सर्व हक्क त्या कंपनीस हस्तांतरीत करणेत येतील.

३. विषयांकित प्रकल्पासाठी मा.स्थायी समितीने मान्यता दिलेल्या दराने तसेच निविदेमधील अटी शर्तीनूसार २१ वर्षाच्या प्रकल्प कालावधीमध्ये येणा-या एकुण खर्चाच्या दायित्वास व प्रदानास तसेच या प्रकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा नूसार प्रशासकीय मान्यता देणेकामी तसेच या प्रकल्पास व वर नमुद अ.क्र. १ ते ३ बाबीस मा.महापालिका सभेची मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक ९)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.पअक/१/कावि/११२/२०१८ दिनांक ०६/०४/२०१८

मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील निविदा नोटीस क्रमांक ENV/8/2017-18 अन्वये पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रामध्ये Construction & Demolition Waste [C&D Waste]Disposal करिता Collection, Transportation, Processing & Management of Construction & Demolition in PimpriChinchwad on DBOT [Design Built Operation & Transfer]Basis Based on Site Recycling Facility [As per C & D Waste Management Rule 2016] उभारणेकामी मागविणेत आलेल्या निविदांपैकी लघूत्तम दराची मे.श्री.संत इन्फ्रा + मे.टी.जे.नाईक ॲन्ड कंपनी + मे.सार्थक इलेक्ट्रोमेक यांचे भागीदारी कंपनीने दाखल केलेल्या लघूत्तम दराच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक २३८३दिनांक २८/०२/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरच्या निविदेमधील अटी शर्तीनूसार विषयांकित कामामध्ये खालील बाबींचा आंतर्भाव आहे.[Scope of Work]

१. शहरात तयार होणारा बांधकामाचा सर्व राडारोडा [C&D Waste]आवश्यक त्या कुंड्या व वाहनांमार्फत प्रक्रियेसाठी मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणेसह यासाठी संपर्क यंत्रणा [Call Centre] उभारणे.

२. वाहतूक करुन आणलेल्या राडारोड्यावर [C&D Waste] निविदेमध्ये नमूद केलेनूसार १५० ते २०० मे.टन प्रतिदिन क्षमतेची प्रक्रिया यंत्रणा उभारणे.

३. प्रकल्प उभारणे व त्याचे चालन, देखभाल व दुरुस्ती करणेचा कालावधी १५ वर्ष असून सदर प्रकल्पासाठी मनपाचा आर्थिक हिस्सा म्हणून निविदा अटी शर्तीमध्ये नमूद विविध टप्प्यानुसार र.रु. १०.०० कोटी आवश्यकतेनुसार देय आहे. सदरचे अनुदान मनपाचे ‘स्वच्छभारत अभियाना अंतर्गत’ मनपाने सादर केलेल्या DPR नूसार शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यास या अनुदानामधून अथवा मनपाच्या फंडातून देणेत येतील.

४. ठेकेदाराने आवश्यकतेनूसार ऑफिस, वर्क शॉप, कॉल सेंटर इत्यादी उभारणे बंधनकारक आहे.

५. सदर प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या तसेच प्रदूषणाविषयी परवानग्या घेणेची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची आहे.

६. तथापी प्रकल्पासाठी आवश्यक वीज पुरवठा व पाणी पुरवठा संबंधित ठेकेदाराने उपलब्ध करुन घ्यावा.

७. मनपा मार्फत सदर प्रकल्पासाठी मोशी कचराडेपोलगतची आवश्यक जागा १५ वर्षे कालावधीसाठी License to use Land तत्वावर संबंधित ठेकेदारास उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

८. या प्रकल्पामधून तयार होणारे Pre-Cast Products मनपाच्या आवश्यकतेनूसार त्या त्या वेळच्या योग्य त्या दराने मनपाच्या स्थापत्य विभागास उपलब्ध करुन द्यावे लागतील.

९. विषयांकित प्रकल्पासाठी सबंधित ठेकेदाराने सादर केलेल्या लघूत्तम दरानूसार – शहरातून निविदा अटी शर्तीनूसार आवश्यक वाहना मार्फत राडारोडा गोळा करणेसाठी प्रति कि.मी. प्रति टनर.रु. १३.५०/- व गोळा केलेल्या राडारोड्यावर आवश्यक तो प्लॅन्ट उभारुन प्रक्रिया करणेसाठी र.रु. २४५.६९/- प्रतिटन + प्रत्येक वर्षी कंत्राट कालावधीमध्ये निविदा अटी शर्तीनुसार महागाई निर्देशंकानूसार [WPI] होणारी वाढ / घट दरानूसार फरकाची रक्कम अदा / वसूल करणे बंधनकारक राहील. या दराने काम करुन घेणेस मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

त्याचप्रमाणे शहरामध्ये बांधकामाचा राडारोडा निर्माण करणा-या कडून घनकचरा अधिनियमानूसार आवश्यक ते User Charges निश्चित करणेचे त्याचप्रमाणे या प्रकल्पातून पूर्ननिर्माण होणा-या Recycled Material पासून तयार होणारे Pre-Cast Productsमनपाच्या

विविध स्थापत्य विषयक कामकाजासाठी वापरण्याचे तसेच त्याचे वेळोवेळी दर ठरविणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे विषयांकित कामाच्या निविदा अटी व शर्तीस अधिन राहून मा.स्थायी समितीने मंजुरी दिलेल्या दरानूसार सदरचा प्रकल्प निविदाधारक मे.श्री.संत इन्फ्रा + मे.टी.जे.नाईक अन्ड कंपनी + मे.सार्थक इलेक्ट्रोमेक यांचे संयुक्त भागीदारी कंपनीमार्फत DBOT(Design – Built – Operate & Transport) तत्वावर उभारणेस येणा-या प्रकल्पाची किंमत सुमारे र.रु. ३०.०० कोटी इतकी आहे. सदरचा प्रकल्प उभारणेसाठी मोशी कचरा डेपो येथील आवश्यक जागा १५ वर्षे कालावधीसाठी निविदेमध्ये नमूद केलेनूसार License to use the Land तत्वावर या जागेचा वापर करणेस तसेच बांधकामाचा राडारोडा गोळा करणे तसेच त्यावर निविदा अटी शर्तीनुसार प्लॅन्ट उभारुन प्रक्रिया करणेसाठी मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. सबब विषयांकित प्रकल्पास मा.महापालिका सभेची खालील बाबींस मान्यता घेणे आवश्यक आहे.

१. सदरच्या प्रकल्पास निविदेमध्ये नमूद मनपाचे अर्थिक अनुदान म्हणून र.रु. १० कोटी हे निविदेच्या अटी शर्तीनुसार प्रकल्पाच्या विविध टप्प्यावर अदा करणेस व

२. सदरचा प्रकल्प उभारणेसाठी मोशी कचरा डेपो मधील आवश्यक जागा १५ वर्षे कालावधीसाठी निविदेमध्ये नमूद केलेनुसार License to use the Land या तत्वावर वापरणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ अन्वये निविदा व करारनाम्यातील खालील अटी व शर्तीस अधिन राहून उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे.

a) सदरची जागा १५ वर्षे कालावधीसाठी निविदेमध्ये नमुद केलेल्या C & D Waste Collection Transportation & Processing च्या प्रकल्पासाठीच License to use the Land तत्वावर वापरणेस परवानगी देणेत येईल व यापोटी LicenseFee म्हणून कंपनीस मनपाकडे र.रु १/- प्रति एकर प्रति वर्षे प्रमाणे रक्कम भरावी लागेल.

b) C & D Waste प्रकल्पासाठी निश्चित केलेली मोशी कचरा डेपो येथील जागा ‘जशी आहे तशी’ सबंधित ठेकेदाराला हस्तांतरीत केली जाईल व यानंतर संपूर्ण प्रकल्प कालावधीमध्ये या जागेची सुरक्षिततेची जबाबदारी कंपनीची राहील.

c) सदरच्या जागेची मालकी मनपाची असल्याने प्रकल्प कालावधीत किंवा नंतरही या संपूर्ण जागेवर किंवा त्यापैकी काही जागेवर कंपनीस किंवा त्रयस्थ संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा हक्क (Mortgage Rights) प्रस्थापित करता येणार नाही.

d) प्रकल्प कालावधीत मनपाच्या किंवा शासनाच्या प्रतिनिधींना या जागेमध्ये तपासणी किंवा पाहणी करणेसाठी पूर्ण मुभा राहील. तसेच संबंधीत कंपनीला मनपाच्या पूर्वपरवानगी शिवाय सदरची जागा प्रकल्पाव्यतिरिक्त कोणत्याही इतर काणासाठी वापरता येणार नाही.

e) प्रकल्प कालावधी संपल्यानंतर किंवा दरम्यानच्या काळात करारनामा कोणत्याही कारणाने किंवा करारनाम्यामधील नमूद अटी शर्तींचा भंग केल्यास सदरच्या प्रकल्पासाठीची जागा वापरणेची परवानगी कोणतेही कारण न देता आपोआप रद्द होईल यानंतर करारनाम्याच्या तरतुदीनूसार दुस-या कंपनीशी Substitution Agreement केल्यास सर्व प्रकल्प जसा आहे तसा व प्रकल्पाचे सर्व हक्क त्या कंपनीस हस्तांतरीत करणेत येतील.

३. विषयांकित प्रकल्पासाठी मा.स्थायी समितीने मान्यता दिलेल्या दराने तसेच निविदेमधील अटी शर्तीनुसार १५ वर्षाच्या प्रकल्प कालावधीमध्ये येणा-या एकुण खर्चाच्या दायित्वास व प्रदानास तसेच या प्रकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार प्रशासकीय मान्यता देणेकामी तसेच या प्रकल्पास व वर नमूद अ.क्र. १ ते ३ बाबीस मा.महापालिका सभेची मान्यता देणेबाबत विचार करणे.

-----

## समित्यांचे अहवाल

### विधी समिती

**विषय क्रमांक १०)** अ) दिनांक २३/०२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक ०३/०३/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.
क) दिनांक २७/०३/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

### मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ११)** अ) दिनांक ०६/०३/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक २०/०३/२०१८ व २७/०३/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

### मा.शहर सुधारणा समिती

**विषय क्रमांक १२)** अ) दिनांक २७/०२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक १३/०३/२०१८ व २७/०३/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

**विषय क्रमांक १३)** अ) दिनांक ९/०२/२०१८ व दि.१२/०२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/६/कावि/१३६/२०१८
दिनांक : ११/४/२०१८

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.